**मूल्य व मूल्यशिक्षण संकल्पना:**

अमेरिकन शिक्षणतज्ञ Dewey (1948) यांच्या मते, मूल्य संकल्पनेत (i) The idea of prizing, cherishing and dear. (ii) The idea of reflection and making connections between the factors of the situation in one's existence to the end that intelligence is employed and that improved judgement is concluded. (iii) The idea that action in support of an approved value will be taken यांचा समावेश होतो.

The Encyclopedia of Philosophy (1992) मध्ये मूल्यसंकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे, 'Value' as a more concrete noun - for example, when we speaks of 'a value" or of values' - is often used to refer to what is valued, judged to have value, through to be good or desired.

**मूल्यशिक्षण म्हणजेच नैतिक शिक्षण होय:**

सर्वांच्या हिताकरिता कर्माने, तनाने, मनाने व वाणीने झटा वयास लावणारे जे शिक्षण ते नैतिक शिक्षण, सामाजिक हित साधण्यासाठी स्वःतच्या इच्छा, आकांक्षा व प्रवृत्तीवर बंधन घालण्याची प्रेरणा ज्या शिक्षणामुळे मिळते ते नैतिक शिक्षण होय.

"राष्ट्राचा व विश्वाचा एक सुजाण नागरिक बनविण्याच्या दृष्टीने बालकाचा सामाजिक, भावनिक व तात्त्विक विकास घडवून आणण्यासाठी प्रचलित अभ्यासक्रमामध्ये निर्माण केलेली अनुभवांची व उपक्रमाची नियोजनबद्ध क्रमपरंपराच नैतिक शिक्षण होय"

"नैतिक शिक्षण म्हणजे सुसंस्कृत नागरी जीवनाचे संस्कारित केलेले शिक्षण होय. जे शिक्षण मानवी व्यवहारांचे आदर्श व जीवनमूल्ये यांचे नियमन करते ते शिक्षण म्हणजे नैतिक शिक्षण होय."

Schwartz (1996) यांच्या नुसार " मूल्य ही अत्यंत सूक्ष्म तसेच व्यापक संकल्पना आहे. सूक्ष्म स्तरावर वैयक्तिक वर्तणुकीच्य दृष्टीने मूल्य ही सामाजिक जीवनातील आवश्यकता आणि व्यक्तीच्या गरजा यामध्ये सुसंगती निर्माण करून व्यक्तीचा अंतर्गत दर्जा वाढविण्याकरिता प्रेरणा देतात. व्यक्तीला प्रत्यक्ष कृती करण्याकरिता मूल्यमापन करणे मूल्यामुळे सहज शक्य होते.

वेदान्ते (१९९१) यांच्या मते "लोकशाही मूल्यांचे रक्षण, सामाजिक, राजकीय मार्ग, आर्थिक समतेचे संवर्धन, सर्वधर्माच्या सांस्कृतिक परंपरेतून आलेल्या मंगल मूल्यांचा स्वीकार व प्रत्येक धर्मातील अनिष्ट गोष्टींना कडवा प्रतिकार यासारख्या गोष्टींना पायाभूत असणारी तात्विक भूमिका इतरांना समजावून सांगणे व शिक्षणाच्या होतात आणि बाह्य समाज जीवनात या तत्त्वांच्या पाल नासाठी यांना कटिबद्ध करणे म्हणजेच खरे मूल्यशिक्षण होय."

**मूल्य शिक्षणाची उद्दिष्टे (Objectives of Value Education):**

मूल्य शिक्षणांची काही ठराविक उद्दिष्टे असतात.

१) व्यक्ती म्हणून निरोगी आणि निरामय जीवनाचा विकास करता येणे शक्य असते.

२) सामाजिक बांधिलकी जपणे आणि एकमेकांमध्ये आदरभाव वाढीस लागतो.

३) आपल्या परिसरातील निसर्ग, प्राणी यांना जमेल ती मदत करणे आणि त्यांची जोपासना करणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. समाजाचे ऋण म्हणून वागणे, त्याची परतफेड करणे हे मूल्यशिक्षणामुळे शक्य होते.

४) स्वतंत्र राष्ट्राचा एक नागरिक म्हणून राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय मूल्यांचा स्वीकार करणे महत्त्वाचे असते.

५) कुटुंबात आदरपूर्वक वागणे. भारतीय राज्यघटने मध्ये लोकशाही, समाजवादी समाजरचनेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शालेय स्तरावर मूल्यशिक्षणाचे खूप महत्त्व निर्माण झालेले आहे.

६) मूल्य शिक्षण शालेय जीवनामध्ये मुलांमध्ये रूजवणे खूप आवश्यक झाले असून यासाठी शासन स्तरावर प्रयत्न केले जात आहेत.

७) सदाचार, नैतिकता, सभ्यता,सुसंस्कृतपणा इ. गुणांची वाढ होणे मूल्यशिक्षणामुळे शक्य आहे.

८) ज्या परिसरात आपण वाढतो, लहानाचे मोठे होतो त्या परिसरा बद्दल सक्रिय प्रेम वाढीस लागणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट पूर्ण होण्यास मदत होते.

**मूल्यशिक्षणाचे फायदे किंवा उपयोग (Benefits of value Education):**

१) मूल्यशिक्षण हे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये जीवन जगताना एक माणूस म्हणून खूप उपयोगी असते.

२) शिक्षणामुळे माणूस प्रगत होतो. अलीकडच्या काळात साक्षरतेच्या टक्केवारीत वाढ झालेली असली तरी विचार करणे, शिकणे ऐवजी केवळ वाचन - लेखन करण्यात सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित केले जात आहे.

३) आजच्या शिक्षणामध्ये मूल्य शिक्षणाचा वापर खूप कमी प्रमाणात आढळतो आणि हयाचा प्रत्यय वाढलेले शहरीकरण, आधुनिकीकरणामुळे लोकांची नैतिक मूल्ये दिवसेंदिवस कमी होत चाललेले आहेत.

४) वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या आपल्यांला स्पर्धा पाहायाला मिळत आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या जीवनातील आनंद कमी होत चाललेला आहे. प्रत्येक जण पैसा कमावण्याच्या मागे लागलेला असल्याने विश्वास,अखंडता, प्रेम आणि बंधुत्व या सर्व गोष्टी काळानुसर लुप्त होत चाललेल्या असल्याने हे नैतिक मूल्य आपल्याला या ठिकाणी वाचवू शकतात.

५) विद्यार्थी, समाज आणि राष्ट्राच्या भविष्याचा पाचा मूल्यशिक्षणाचा आहे. ते यशस्वी होण्यासाठी नागरिक नैतिक दृष्ट्या सुसज्ज असणे महत्वाचे असते. घर, शाळा आणि महाविद्यालयात शिक्षक, मार्गदर्शक आणि पालक यांच्या द्वारे नैतिक शिक्षण मुलांना लहानपणापासून दिले जाऊ शकते. मुलांसमोर आचरण, विचार, चांगले नैतिक मूल्य रुजवणे अपेक्षित असते. मूल्यशिक्षण सर्वा साठी महत्त्वाचे आणि गरजेचे झालेले आहे.

६) मूल्यशिक्षण वाईट सवयीवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते स्वतःमध्ये सकारात्मक विचारसरणी तयार करणे, सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करते.

७) व्यक्तिमत्व विकसित करण्यामागे मूल्य शिक्षणाचा खूप मोठा वाटा आहे मानवी जीवनामध्ये मूल्य रुजवण्यासाठी हे 10 नैतिक मूल्य खूप आवश्यक आहेत. स्वच्छतेचे आणि वेळेचे गुणधर्म शिकण्यासाठी मूल्यशिक्षण खूप महत्वाचे ठरते.

८) भावनिक, बौद्धिक आणि शारीरिक विकास घडवून आणण्यामागे मूल्य शिक्षणाचा खूप महत्त्वाचा वाटा आहे. एक चांगला माणूस होण्यासाठी मूल्यशिक्षणाची खूप मदत होत असते.

**माध्यमिक शालेय शिक्षणात मूल्यशिक्षणाचे स्थान:**

शालेय शिक्षणातील अभ्यासक्रमात मूल्यशिक्षणाचा अंतर्भाव ही मुख्यत्वे महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रामधील लक्षणीय घटना म्हणावी लागेल. सर्वसाधारणपणे मुले आणि प्रामुख्याने मुलींच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने अशा प्रकारच्या शिक्षणाला अनन्यसाधारण स्थान आहे.

मूल्यशिक्षण हा विषय पारंपरिकदृष्ट्या धार्मिक शिक्षण किंवा नैतिक शिक्षणाशी जोडलेला होता. परंतू मूल्य शिक्षण हे अधिक व्यापक, व्यवहार्य आणि अधिक आत्मसात करण्यास योग्य आहे. मूल्यशिक्षणामध्ये नैतिक, मानसिक, सामाजिक, सौंदर्यविषयक, सांस्कृतिक किंवा आध्यात्मिक मूल्यांद्वारे कोणत्याही विशिष्ट प्रकारची श्रद्धा, विश्वास, धर्म किंवा प्रवृत्ती प्रतिबिंबित होत नाही.

**माध्यमिक शिक्षणातील मूल्याचे स्थान व महत्व:**

स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणावर शिक्षणांचा प्रसार झाला असला तरी गुणवत्ता व मूल्ये यांचा -हास झालेला दिसून येतो.

"values are caught, they cannot be taught असे असले तरी व्यक्तीने केलेल्या अचूक प्रयत्न व कष्टाने व्यक्तीच्या मूळ गुणांचा विकास व दुर्गुणांचा -हास करणे सहज शक्य आहे, भावी पिढी सुसंस्कृत,सत्प्रवृत्त व्हावी यादृष्टीने शिक्षणामध्ये मूल्यांचा समावेश करणे केवळ

महत्वाचे नव्हे तर अपरिहार्य झाले आहे.

शिक्षणतज्ज्ञ डॉ. राधाकृष्णन (1949) मानवी जीवनातील मूल्याची आवश्यकता विषद करताना म्हणतात " मानवी मनाच्या प्रशिक्षणासाठी केवळ शालेय शिक्षण पुरेसे नाही. खरी गरज आहे आत्मज्ञानाची. त्यासाठी मानवी मूल्यांचा शिक्षणात अंगीकार करणे जरूरीचे आहे.

देवस्थळी (1989) यांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या संदर्भात “मूल्यशिक्षण आणि त्याची माध्यमिक स्तरावरील सद्य: स्थिती" या

लेखामध्ये, आपल्या शिक्षणप्रणालीतील आणि समाजातील बऱ्याचशा घातकी आणि दुष्ट प्रवृत्ती, गुन्हेगारी, हिंसाचार, भ्रष्टाचार , सामाजिक वातावरणातून झिरपणारी पूर्वग्रहदूषित भावना आणि गंड , मनोविकृती, जात्यांधपणा, वंशवाद, भाषावाद आणि प्रादेशिक वाद नाहिसे करावयाचे असतील तर मूल्य शिक्षणाला पर्याय नाही असे मत व्यक्त केले.

**माध्यमिक शिक्षण - अर्थ, उद्देश:**

भारतामध्ये माध्यमिक शिक्षणाला अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. माध्यमिक शिक्षणाला माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण यांना जोडणारा दुवा समजले जाते. या स्तरातील विद्यार्थी किशोरावस्थेतील असतात. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून किशोरावस्थेला महत्त्वाचे स्थान आहे. प्राथमिक शिक्षण व विद्यापीठीय शिक्षण यांच्यामध्ये संबंध प्रस्थापित केले जातात.

**माध्यमिक शिक्षण – महत्त्व:**

१) प्राथमिक शिक्षण व उच्च शिक्षण यांच्यामधील दुवा म्हणून काम करते

२) या स्तरावर किशोरावस्थेतील मुले, मुली जे अध्ययन करतात त्यावर त्यांचे व्यक्तिमत्त्व विकास अवलंबून असतो.

३) इथूनच त्यांच्या व्यावसायिक शिक्षणाला प्रारंभ होत असतो.

४) माध्यमिक शिक्षण समाज व राष्ट्रासाठी अतिशय महत्त्वपूर्ण आहे

५) सामाजिकता व सामुदायिकतेचा विकास यातून होतो.

६) विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आधारभूत म्हणून माध्यमिक शिक्षण ठरते.

७) माध्यमिक शिक्षणातूनच विद्यार्थ्यांची जीवन जगण्याची कला विकसित होते.

प्रो. हुमायूँ कबीर म्हणतात - माध्यमिक शिक्षा, शिक्षा की एक ऐसी कड़ी है जो प्राथमिक व उच्च शिक्षा को एक दृढ़ता के साथ एक कड़ी मे बाँधती है।

**माध्यमिक शिक्षणाचा अर्थ:**

शालेय शिक्षण हे प्रामुख्याने तीन भागात विभागाले गेले आहे. पूर्व-प्राथमिक शिक्षण, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण .

शालेय शिक्षणाचे हे तीन स्तर व्यक्तीच्या तीन अवस्थांशी संबंधित आहेत. पूर्व प्राथमिक शिक्षण शैशवावस्थेशी संबंधित आहे ,प्राथमिक शिक्षण बाल्यावस्थेशी संबंधित आणि माध्यामिक शिक्षण हे किशोरावस्थेशी संबंधित मानले जाते. पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षणानंतरची शिक्षणाची अवस्था म्हणजेच माध्यमिक शिक्षण.

**एस. एन. मुखर्जी ने माध्यमिक शिक्षणाला तीन भागात विभागले आहे**:

१) परिस्थितीनुसार - प्राथमिक शिक्षणानंतर येणारा शिक्षणाचा टप्पा म्हणजे माध्यमिक शिक्षण

२) प्रकारानुसार - माध्यमिक शिक्षणाचा संबंध निश्चित व बौद्धिकतेच्या विभाजनाशी येतो.

३) स्तरानुसार - माध्यमिक शिक्षणाला बौद्धिकतेची कसोटी म्हटले जाते कारण विद्यापीठीय शिक्षण यावर आधारित आहे. सामान्यतः माध्यमिक शिक्षण इ. 6वी ते इ.12वी पर्यंत मानले जाते. काही राज्यांमध्ये 11वी इ. 12 वी ला उच्च माध्यमिक असेही म्हटले जाते, परंतु हा माध्यमिक शिक्षणाचाच एक भाग आहे.

**माध्यमिक शिक्षणाचा उद्देश:**

माध्यमिक शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी माध्यमिक शिक्षण आयोग - मुदलियार आयोगाची स्थापना करण्यात आली. मुदलियार आयोगाने खालील प्रमाणे उद्देश निश्चित केले.

१) लोकशाही नागरिकत्वाचा विकास करणे.

२) व्यावसायिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे.

३) व्यक्तिमत्वाचा विकास करणे.- माध्यमिक शिक्षणाचे कर्तव्यच आहे. त्यातून बालकाचा सर्वांगिण व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा.

४) नेतृत्वाचा विकास करणे-योग्य व आदर्श नेतृत्व विकसित करणे.

**श्री मुखर्जी हयांनी माध्यमिक शिक्षणाची आवश्यकता थोडक्यात सांगितली..**

१) विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापाठी तयार करणे.

२) विद्यार्थ्यांना उपजीविकेचे साधन हेतु तयार करणे.

३) विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक रित्या विकास करणे.

४) विद्यार्थ्यामध्ये नागरिकत्वाचे गुण विकसित करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे.

**माध्यमिक शिक्षण हे प्रमुख तीन विभागातून दिले जाते:**

१) सी. बी. एस.ई. 2. आई सी. एस. ई 3. राष्ट्रीय स्तर (स्टेट बोर्ड) वरील तीन विभागाची मुख्य भूमिका विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महत्वपूर्ण आहे.

**माध्यमिक शिक्षणातील मूल्यशिक्षणाची भूमिका:**

मूल्ये ही विविध प्रकारची आहेत जसे की, भौतिक मूल्य, बौद्धिक मूल्ये, भावनिक मूल्ये, सौंदर्यविषयक मूल्ये, आध्यात्मिक मूल्ये, जैविक मूल्ये, धार्मिक मूल्य इ.ही सर्व मूल्ये आपापल्या परीने महत्त्वपूर्ण आहेत. ते पूर्णपणे व्यक्तींना त्यांच्या जीवनातील ध्येये ठरवण्यास मदत करतात .ते समाजाला एकत्र ठेवतात, सामाजिक गटाशी संबंधित असल्याची भावना प्रदान करण्यात मदत करतात. ते सद्गुणांना प्रोत्साहन देतात. सत्यता, धैर्य, प्रेम, सहकार्य, शांतता, सहानुभूती, श्रमप्रतिष्ठा इ. जे आपल्या जगात

शांततेने जगण्यासाठी खरोखर खूप आवश्यक आहेत आणि व्यक्तींना चांगल्या नागरिकांमध्ये रूपांतरित करणे ,ज्यामुळे मानवतेच्या प्रसारांस मदत होईल, आपल्या भारतीय राज्यघटनेने न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही चार वैश्विक मूल्येही मांडली आहेत. तथापि विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आणि आधुनिकीकरणामुळे मानवी मूल्यांची दिवसेंदिवस अधोगती होत चालली आहे आणि शेवटी विविध प्रकारच्या सामाजिक समस्यांना आमंत्रण देऊन समाजाच्या सामाजिक व्यवस्थेचा -हास होत आहे. अशा प्रकारे मानवतेसाठी राष्ट्रातील नागरिकां मध्ये मूल्ये जपण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

एकूण शैक्षणिक व्यवस्थेमध्ये माध्यमिक शिक्षणाला खूप महत्त्वाचे स्थान आहे कारण ते तरुण विद्यार्थ्यांना तयार करुन राष्ट्र उभारणीचे शिक्षण म्हणून गणाने जाऊ शकते, जे उच्च शिक्षणासाठी आणि विविध व्यवसायांसाठी राष्ट्राचे भावी नागरिक आहेत, ते प्राथमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण यांना जोडणारा पूल आहे. माध्यमिक शिक्षणात 14-18 वर्षातील पौगंडावस्थेतील विद्यार्थ्यांचा समावेश होतो. जे आगामी प्रौढ ज्यांच्यामध्ये समाजाचे भावी नेते निर्माण होतील. आणि ते भविष्यातीत समाजाचे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या उत्पादक सदस्य असतील अशाप्रकारे माध्यमिक शिक्षणाच्या स्तराखाली शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षण प्रभावी पद्धतीने दिले गेले तर नक्कीच आपण आपल्या समाजाचे शांततामय आणि सुसंघटित समाजात रूपांतर करु शकतो जिथे वैश्विक बंधुता कायम राहील.

**माध्यमिक स्तरावरील शिक्षणात मूल्यशिक्षणाचे फायदे**:

१) मूल्य शिक्षण विद्यार्थ्यांना इतरांनी सुसंवाद साधण्यास शिकवू शकते.

२) मूल्य शिक्षण नवीन परिस्थितीत जुळवून घेऊन विद्यार्थ्यांनो सत्य शोधण्यासाठी मानसिक बळ देण्याचा प्रयत्न करते.

३) मूल्यशिक्षण विद्यार्थ्यांना त्यांच्या परंपरा आणि संस्कृतीला वाहून घेण्यास मदत करते.

४) मूल्यशिक्षण विद्यार्थ्यांना अन्याय, हिंसाचार, भ्रष्टाचार इ.विविध सामाजिक वाईट गोष्टींविरुद्ध उभे राहण्यास तयार करण्यास मदत करते.

५) मूल्यशिक्षण जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित करते.

६) मूल्यशिक्षण नागरिकत्वाचे खरे स्वरूप- त्याची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यास मदत करते.

७) तसेच विद्याथ्यांना राष्ट्राची राष्ट्रीय उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करते.

८) हे सार्वत्रिक बंधुत्वाचा भावना विकसित करण्यात मदत करते आणि विविध सामाजिक गटामधील फरकांबद्दल अधिक चांगली जागरूकता आणि प्रशंसा निर्माण करते.

**भारतातील माध्यमिक स्तरावरील शिक्षणामध्ये मूल्यशिक्षण देण्याची धोरणे *:**

**१) सकाळच्या परिपाठाचे आयोजन (organizing morning assembly):** माध्यमिक शाळांमध्ये दररोज सकाळची

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– IV

JULY – AUGUST 2022

Original Research Article

परिपाठातून विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रुजवली जाऊ शकतात. यासाठी भक्तीगीत किंवा देशभक्तीपर गीताचे प्रार्थना गायन, संक्षिप्त नैतिक भाषण इ.चा समावेश सकाळच्या परिपाठातील उपक्रमांतर्गत करावा.

२) **अभ्यासक्रमपूरक उपक्रम आयोजित करणे (organizing co-curricular activities):**माध्यमिक शाळांमध्ये विविध प्रकारच्या मूल्यांशी संबंधित विष यांवर नाटक, गायन स्पर्धा, नृत्यस्पर्धा, कला आणि चित्रकला स्पर्धा इ. विद्यार्थ्यांमधील मूल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकारचे सह-अभ्यासक्रम उपक्रम आयोजित केले जाऊ शकतात.

३) **अभ्यासक्रमात बदल (curriculum modification):** अभ्यासक्रमात काही प्रमाणात बदल व्हायला हवेत. इतिहास, भूगोल, साहित्य, भाषा, नागरिकशास्त्र इ. विविध विषयांतीत प्रकरणे विविध प्रकारच्या मूल्यांशी संबंधित असावीत जेणेकरून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातून मूल्यांचे सार कळू शकेल. माध्यमिक स्तरावरील शिक्षणाच्या अभ्यासक्रमात मूल्याभिमुख पुस्तकांना स्थान मिळाले पाहिजे

४) **तज्ज्ञाची व्याख्याने (Lectures from experts)**: नैतिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, सौंदर्यशास्त्र इ.विविध प्रकारच्या मूल्यांशी संबंधित विविध क्षेत्रातील तज्ञाना शाळा प्रशासनाकडून वेळोवेळी शाळांमध्ये आमंत्रित केले जावे.

५) **राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिन साजरा करणे. celebrating national and international days):**
शाळांमधून राष्ट्रीय दिन व आंतरराष्ट्रीय दिन साजरा करणे तसेच विविध राष्ट्रातील ज्या महान व्यक्तींनी नैतिक मूल्ये जोपासण्यासाठी महान कार्य केले त्यांच्या जयंती, पुण्यतिथी साजरी करणे.

६) **विविध माध्यमांचा उपयोग करणे. (use of mass media)**; शैक्षणिक चित्रपट, थिएटर, वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन इ. विविध प्रकारच्या माध्यमांच्या मदतीने माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेत असलेल्या
विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षण प्रभावीपणे दिले जाऊ शकते.

७) **सामाजिक सेवा कार्यक्रम (Social service programmes)**: शाळा विविध सामाजिक सेवा कार्यक्रम आयोजित करू शकतात. विविध प्रकारची मूल्ये जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करतात, तसेच विद्यार्थ्यांमध्ये मूल्य शिक्षण देण्याचा प्रयत्न करतात. याव्यतिरिक्त, शाळा विद्यार्थ्यांना मुलींचे मार्गदर्शन, स्काऊटिंग आणि राष्ट्रीय सेवा योजनेत सक्रिय सहभाग घेण्यास प्रवृत्त करु शकते.

८) **गट प्रकल्प (Group Projects):** विविध मूल्याभिमुख गट प्रकल्प प्रभावी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली असू शकतात, जिथे विद्यार्थी सहकार्य, सामूहिक कार्य आणि इतर विविध मूल्ये शिकू शकतात.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022

Original Research Article

**सीबीएसई आणि एनसीईआरटीने माध्यमिक स्तरावरील शिक्षणामध्ये मूल्यशिक्षणाची पुनरावृत्ती करण्यासाठी उचललेली पावले:**

सीबीएसई आणि एनसीईआरटी या दोन्ही संस्था माध्यमिक स्तरावरील शिक्षणाच्या अभ्यासक्रमात मूल्यशिक्षणाचा पुन्हा समावेश करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. असे लक्षात आले आहे की सीबीएसईने 2003 मध्ये इयत्ता 6 वी आणि 7 वी मध्ये जीवनकौशल्य सादर केली होती आणि 2005 पर्यंत ती 10 वी पर्यंत वाढवली आहेत. या व्यतिरिक्त, सीबीएसई ने मूल्य आधारित एकात्मिक शिक्षणांची संकल्पना सादर केली आहे जिथे सर्व धडे काही मूल्यांशी जोडलेले आहेत.

**निष्कर्ष:**

वरील विवेचनावरून मूल्यशिक्षणाचे आजच्या समाज जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे हे लक्षात येते. माध्यमिक स्तरावर शिक्षणात मूल्यशिक्षणाऱ्या समावेश केल्यामुळे या वयातील मुने, मुली भावी जीवनात एक चांगला नागरिक जो समाजातील वाईट, दुष्ट शक्तींचा संहार करील व समाजातील वातावरण शांत ठेवण्यासाठी मदत करील. त्यामुळे संपूर्ण मानवजातीच्या भल्यासाठी प्राथमिक स्तरापासून ते माध्यमिक स्तरापर्यंत सुरू होणाऱ्या प्रत्येक शैक्षणिक संस्थेत मूल्यशिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे

**संदर्भ:**

मानवाधिकार आणि मूल्यशिक्षण - Human Rights and Value Education - लेखक डॉ. दिलीपसिंह निकुंभ | डॉ. रणजित आठवले - प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव

किशोरावस्था आणि मूल्यशिक्षण-डॉ. लीना सुनील कांडलकर - बोके प्रकाशन, अमरावती.

नीतीमूल्ये व शिक्षण. डॉ. विद्या ठोंबरे, नूतन प्रकाशन, पुणे

वाचनमित्र - मूल्यशिक्षण, विविध माहिती व लेख, शैक्षणिक तत्त्व http://www.vachan mitra.com - 30 May 2017.

माध्यमिक शिक्षा - by Bandey September 04, 2020

Role of ralue Education in secondary level of education -Rashmi Rekha Rabha.

M.Phil. Research Scholer, Department of Edu. Gauhati, University Gauhati (Assam) India.

*Cite This Article:*

**** डॉ. सौ. मिनाक्षी वेदांत रत्नपारखी** (2022).* शिक्षण माध्यमिक शालेय शिक्षणात मूल्यशिक्षणाची भूमिका, ***Educreator Research Journal, Volume–IX, Issue– IV,*** *July – August 2022, 114-122.*